नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १९२ | Issue - 192 | वार शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर २०२४ | Blow- Friday Date 29 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात



### हेमंत सोरेन यांचा शपथविधी

रांची : झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी गुरुवारी रांची येथे एका भव्य सोहळ्यात झारखंडचे १४वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्याचे राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी इंडिया आघाडीचे सर्व महत्त्वाचे नेते उपस्थित होते. रांचीमधील मोराबादी मैदानात झालेल्या शपथविधी सोहळ्याला हजर राहण्यापूर्वी ४९ वर्षीय हेमंत सोरेन यांनी झामुमोचे अध्यक्ष आणि त्यांचे वडील शिबू सोरेन यांची भेट घेतली. शपथविधीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्ष-नेते राहुल गांधी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि 'आप'चे नेते अरविंद केजरीवाल उपस्थित होते. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यापूर्वी ''राज्यातील जनतेचे ऐक्य हेच आमचे सर्वात मोठे शस्त्र आहे, आमच्यात कोणी फूट पाडू शकत नाही किंवा आम्हाला गप्पही करू शकत नाही'', असा विश्वास हेमंत सोरेन यांनी व्यक्त केला. भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे नाव न घेता, ''जेव्हा जेव्हा त्यांनी आम्हाला गप्प करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तेव्हा आमची क्रांती मोठी झाली'', असे सोरेन यांनी 'एक्स'वर लिहिले. विधानसभा निवडणुकीत झामुमोच्या नेतृत्वात इंडिया आघाडीने ८१पैकी ५६ जागांवर विजय मिळवला असून हेमंत सोरेन हे त्यांच्या बारहैत मतदारसंघातून जवळपास ४० हजार मतांनी विजयी झाले आहेत.

# दिल्लीत अमित शाहांच्या निवासस्थानी महायुतीचे नेते भेटीला

## राज्याचे मुख्यमंत्री कोण होणार?; २ डिसेंबरपर्यंत महाराष्ट्रात नवे सरकार स्थापन होणार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोण होणार याकडे सर्वांच्याच नजरा लागल्या असून या संदर्भातील घडामोडींना वेग आला आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे गुरुवारी रात्री दिल्ली केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी पोहोचले असून या तीन नेत्यांसह अमित शाहांची बैठक सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री पुन्हा देवेंद्र फडणवीस होतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. तसंच २ डिसेंबरपर्यंत महाराष्ट्रात नवं सरकार स्थापन होऊ शकतं, अशीही माहिती आहे.

गुरुवारी रात्री सुरुवातीला काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अमित शाहांच्या भेटीसाठी त्यांच्या निवासस्थानी पोहाचले होते. त्यानंतर काही वेळाने देवेंद्र फडणवीस, खासदार सुनील तटकरे आणि अजित पवार अमित शाहांच्या भेटीला गेले. गुरुवारी रात्री जवळपास १० वाजून २० मिनिटांपासून महायुतीचे नेते अमित शाहांच्या घरी पोहोचले. महायुतीच्या नेत्यांची अमित शाहांसोबतच्या भेटीनंतर राज्याचे नवे मुख्यमंत्री कोण होणार याची घोषणा होऊ शकते. चले.



एकनाथ शिंदे दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं, की बुधवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. आता हा लाडका भाऊ दिल्लीत आला आहे. माझ्यासाठी लाडका भाऊ हेच सर्वात मोठं पद असल्याचं ते म्हणाले. दरम्यान देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांचा अमित शाहांसोबतचा एक फोटो समोर आला आहे. या फोटोमध्ये देवेंद्र फडणवीस स्मित हास्य करताना दिसत आहेत. या फोटोवरुन राजकीय वर्तुळात फडणवीस हेच तिसऱ्यांदा पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील अशी चर्चा होत आहे.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने २८८ जागांपैकी २३० जागा जिंकल्या. भाजपने १३२, शिवसेना ५७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागा जिंकल्या. महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने (UBT) २० जागा, काँग्रेसने १६ आणि शरदचंद्र पवारांच्या राष्ट्रवादीने (SP) १० जागा जिंकल्या.

# वाढलेल्या मतांवर विरोधकांचे प्रश्नचिन्ह; दुसऱ्या दिवशी मतटक्का वाढल्याचा पटोले, आव्हाडांचा दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई / ठाणे : विधानसभा निवडणुकीत मतांच्या टक्केवारीत मोठ्या प्रमाणावर तफावत असल्याचा दावा विरोधी पक्षांनी गुरुवारी केला. मतदानाच्या दिवशी आकडेवारी ५८.२२ टक्क्यांवर असताना दुसऱ्या दिवशी मात्र ती ६६.०५ टक्क्यांपर्यंत कशी गेली, असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पोस्टलमध्ये सर्वाधिक मते असताना मतमोजणीत मात्र हा कल कायम राहिला नाही, असे सांगत राष्ट्रवादीचे (शरद पवार) नेते जितेंद्र आव्हाड यांनी मतदान यंत्रांबाबत शंका उपस्थित केली.

मतदानाचा दिवशी आलेल्या मतटक्क्यांमध्ये दुसऱ्या दिवशी तब्बल ७.८३ टक्क्यांची वाढ झाली असल्याचे पटोले यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार




परिषदेत निदर्शनास आणून दिले. महाविकास आघाडीकडून ईव्हीएमविरोधात जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. यासंदर्भात टिळक भवन येथे सलग दुसऱ्या दिवशी काँग्रेसच्या पराभूत व विजयी आमदारांची बैठक पार पडली. बैठकीत पुन्हा एकदा ईव्हीएमविरोधात रोष व्यक्त करण्यात आला. सायंकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के, रात्री ११.३० वाजता ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी ६६.०५ टक्के इतके मतदान झाल्याचे सांगण्यात आले. इतके मतदान कसे वाढू शकते असा सवाल पटोले यांनी केला. मतदान झाल्यानंतर निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदही घेतली नाही. यामुळे आयोगाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे ते म्हणाले. ठाण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत आव्हाड यांनीही हाच मुद्दा उचलून धरला. सायंकाळी ६ ते रात्री ११ यावेळेत अचानक मतदानाच्या टक्केवारीत वाढ होते कशी आणि वाढीव मतदान येते कुठुन, असा सवाल त्यांनी केला. मतदान यंत्र हे मानवनिर्मित असल्यामुळे त्यात बदल करणे शक्य आहे. मतदान झाल्यानंतर मतदान यंत्रामध्ये मतदानाचा आकडा लगेचच उपलब्ध होतो. तरीही मतदानाची आकडेवारी देण्यास उशीर कसा काय होतो, असे आव्हाड म्हणाले. नाशिकमध्ये सत्ताधारी पक्षांच्या उमेदवारांना मिळालेली मते जवळपास एकसारखीच असून एखाद्या पॅर्टनशिवाय हे शक्यच नाही, असा दावाही त्यांनी केला.

# पूलावरुन मोटार नदीत कोसळून दोन महिलासह तिघे ठार, ३ जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली : कोल्हापुरात लग्न समारंभ आटोपून घरी येत असताना मोटारीवरील ताबा सुटल्याने अंकली पूलावरुन कृष्णा नदीत मोटार कोसळून झालेल्या अपघातात दोन महिलासह तिघे ठार तर तिघे जखमी झाले. मध्यरात्री ही दुर्घटना घडली असून अपघातग्रस्त सांगलीचे रहिवासी आहेत.



लग्न सोहळा आटपून सांगलीकडे येताना गाडीवरील ताबा सुटल्याने मोटार थेट नदीपात्रात कोसळली या भीषण अपघातात तिघांचा मृत्यू झाला. मृतात दोन महिला आणि पुरुषाचा समावेश आहे. यातील मृत कुटुंबीय हे सांगलीतल्या कोल्हापूर रोडवरील गंगाधर कॉलनी येथील रहिवासी आहेत.

कोल्हापूर येथून एक लग्न सोहळा आटोपून हे कुटुंबीय सांगलीकडे येत होते. त्यांची मोटार जयसिंगपूर हुन सांगली कडे येत असताना अंकली पुलावर गाडीवरील ताबा सुटला आणि थेट नदी पात्रात कोसळली. यामध्ये प्रसाद भलचांद्र खेडेकर (४०), प्रेरणा प्रसाद खेडेकर (३५) , वैष्णवी संतोष नार्वेकर (२३) यांचा मृत्यू झाला तर साक्षी संतोष नार्वेकर (४२), वरद संतोष नार्वेकर (२१) आणि समरजित प्रसाद खेडेकर (५) हे जखमी झाले आहेत.

# देशात लोकशाहीचे वस्त्रहरण; डॉ. बाबा आढाव यांचे उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आज देशात लोकशाहीचे अक्षरशः वस्त्रहरण सुरू झाले आहे. त्याविरोधात राज्य घटनेने दिलेल्या अधिकारांनुसार तीन दिवसांचे आत्मक्लेश आंदोलन करत आहे. आता नागरिकांनी रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. हे करूनही गरज भासल्यास या सरकारविरोधात सत्याग्रह करावा लागेल, अशी टीका ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांनी केली. ईव्हीएमबाबत संशय घेण्यास जागा आहे, असेही त्यांनी नमूद केले.

महात्मा फुले वाडा येथे डॉ. आढाव यांनी गुरुवारपासून आत्मक्लेश उपोषण सुरू केले आहे. रिक्षा पंचायतीचे नितीन पवार, संदेश भंडारे या वेळी उपस्थित होते. हे उपोषण ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. डॉ. आढाव म्हणाले, की अदानींचे प्रकरण घडत असताना पंतप्रधानांनी परदेशातून त्यांना पाठिंबा दिला. या प्रकरणाची संसदेत वाच्यताही होऊ नये म्हणून जे चालले आहे ते लांछनास्पद आहे. विधानसभा निवडणुकीत सरकारी पैशाचा खुळखुळा वाजला. जनतेने या पैशाला भुलू नये. मतदानानंतर मतदानाच्या आकडेवारीमध्ये सतत बदल होतात. त्यामुळे ईव्हीएमबाबत शंका घेण्यास जागा आहे आणि ती रास्त आहे. हिंदू-मुस्लिम वाद निर्माण केले जात आहेत. मुस्कटदाबीच्या विरोधात समाजातील जागरूक वर्गाने बोलले पाहिजे. एकटा माणूसही बोलू शकतो ही लोकशाहीची शक्ती आहे. महात्मा फुले समता पुरस्काराच्या कार्यक्रमासाठी फुलेवाडा येथे आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी कार्यक्रमानंतर डॉ. आढाव यांची भेट घेतली. भुजबळ यांनी डॉ. आढाव यांना प्रकृतीची काळजी घेण्याबाबत सांगितले.

# मंत्र्यांच्या दालनांना अखेर कुलूप; मंत्रालयातील कारभार गुंडाळण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर सरकारचा मंत्रालयातील कारभार गुंडाळण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. त्यानुसार शुक्रवारी संध्याकाळपर्यंत सर्व मंत्र्यांची दालने रिकामी करावीत आणि संबंधित मंत्र्याकडील अधिकारी- कर्मचाऱ्यांनी आपल्या मूळ विभागात परत जावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यातील विद्यामान महायुती सरकारचा पाच वर्षांचा कालावधी २६ नोव्हेंबर रोजी संपला. त्याच दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे य़ांनी आपल्या



पदाचा राजीमाना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे सुपूर्द केला. मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर सरकारचा कार्यकाल संपुष्टात आला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री सचिवालय, उपमुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांची दालने रिकामी करावीत. कार्यालयातील नस्ती संबंधित विभागाकडे जमा कराव्यात. अन्य कागदपत्रे नष्ट करावीत आणि दालने सामान्य प्रशासन विभागाच्या ताब्यात द्यावीत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**नव्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीची तयारी सुरू**

राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर हे सरकार कोणाच्या नेतृत्वाखाली असेल, मंत्रिमंडळात कोणाला स्थान असेल हे अद्याप गुलदस्त्यात असले तरी नव्या सरकारच्या शपथविधीसाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी वानखेडे स्टेडियम अथवा शिवाजी पार्क येथे होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मात्र वानखेडे स्टेडियम येथे क्रिकेट स्पर्धा सरू असून विवाह सोहळ्याच्या तारखाही ठरलेल्या आहेत.

६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या लाखो अनुयायांसाठी शिवाजी पार्कवर तयारी सुरू आहे, तर आझाद मैदानावर मुस्लीम समाजाचा इज्तेमा आहे. या कार्यक्रमांसाठी ही मैदाने आरक्षित असल्यामुळे वांद्रे कुर्ला संकुलातही शपथविधी होऊ शकतो. मात्र प्रशासनाने सध्या शिवाजी पार्क आणि वानखेडे मैदानाची चाचपणी आणि तयारी सुरू केली आहे.

## थंडीचा कडाका आणखी वाढणार

## राज्यात सर्वत्रच शेकोट्या पेटायला लागल्या

# डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यात थंडीचा ज्वर चढणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यात थंडीचा ज्वर चढायला लागला असून आता राज्यात सर्वत्रच शेकोट्या पेटायला लागल्या आहेत. राज्यात सर्वत्रच किमान तापमानात मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. दरम्यान, हवामान खात्याने येत्या तीन दिवसात राज्यातील काही जिल्ह्यात थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे.

उत्तरेकडून हिमालयाच्या दिशेने येणाऱ्या शीतलहरींचा वेग वाढला आहे. त्यामुळे कोरड्या वाऱ्यांचा परिणाम महाराष्ट्रातील हवामानावर होताना दिसून येत आहे. परिणामी राज्यात येत्या तीन दिवसात थंडीचा कडाका आणखी वाढणार आहे. विशेषकरुन मध्य महाराष्ट्रात तापमानात मोठ्या प्रमाणात घसरण होणार असून याठिकाणी थंडीचा जोर वाढणार आहे. तर उत्तर महाराष्ट्रात देखील थंडीच्या लाटेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दरम्यान, अनेक जिल्ह्यांमधील कमाल आणि किमान तापमानात वेगाने घसरण होत आहे. प्रामुख्याने घाटमाथ्यावर धुक्याची चादर दिसू लागली आहे. तर उन्हाळ्यात प्रचंड तापणाऱ्या विदर्भात देखील किमान तापमान गोंदिया येथे ११.४ अंश सेल्सिअस तर नागपूर येथे ११.८ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले.

गेल्या दोन दिवसात राज्यातील सर्वाधिक कमी तापमानाची नोंद निफाडमध्ये ८.३ अंश सेल्सिअस इतकी नोंदवण्यात आली आहे. तर पुण्यात देखील किमान तापमान ९.९ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले आहे. डिसेंबरचा अखेरचा आठवडा चांगलाच गारठवणारा ठरत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातच नाही तर शहरात देखील रात्रीच्या वेळी रस्त्यांवर ठिकठिकाणी आणि विशेषकरुन बांधकामाच्या ठिकाणी मजूर, कष्टकरी थंडीपासून बचावासाठी शेकोट्यांचा आधार घेत आहेत. आतापर्यंत रात्री ते पहाटेपर्यंत जाणवणारी थंडी आता दिवसादेखील जोर धरत आहे. त्यामुळे दिवसाही आता गरम कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे.

हवामान खात्याने पुण्यासह उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नाशिक, जळगाव या जिल्ह्यात थंडीची लाट अधिक तीव्र राहील, असा इशारा दिला आहे. राज्यात पुढील दोन तीन दिवस थंडीचा जोर कायम असणार आहे. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत काम करणाऱ्यांना थंडीपासून बचावासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे. दरवर्षी साधारणपणे दिवाळीच्या सुमारास थंडीला सुरुवात होते. मात्र, यावेळी उशिराने थंडीला सुरुवात झाली. गुलाबी थंडीचा आनंद फार दिवस घेता आला नाही, पण डिसेंबरच्या अखेरीस



अचानकपणे थंडीत वाढ झाली. किमान तापमानात अतिशय वेगाने घसरण सुरू झाली. उत्तरेकडून येणाऱ्या शीतलहरींमुळे राज्यात थंडीचा जोर वाढला असल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे. तर येत्या तीन दिवसात थंडीचा कडाका आणखी वाढणार आहे. त्यामुळे ठिकठिकाणी शेकोट्यांची संख्याही वाढणार हे निश्चित आहे.

## संपादकीय....

### मतटक्क्यावरून घमासान

विधानसभा निवडणुकीत मतांच्या टक्केवारीत मोठ्या प्रमाणावर तफावत असल्याचा दावा विरोधी पक्षांनी गुरुवारी केला. मतदानाच्या दिवशी आकडेवारी ५८.२२ टक्क्यांवर असताना दुसऱ्या दिवशी मात्र ती ६६.०५ टक्क्यांपर्यंत कशी गेली, असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पोस्टलमध्ये सर्वाधिक मते असताना मतमोजणीत मात्र हा कल कायम राहिला नाही, असे सांगत राष्ट्रवादीचे (शरद पवार) नेते जितेंद्र आव्हाड यांनी मतदान यंत्रांबाबत शंका उपस्थित केली. मतदानाचा दिवशी आलेल्या मतटक्क्यांमध्ये दुसऱ्या दिवशी तब्बल ७.८३ टक्क्यांची वाढ झाली असल्याचे पटोले यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत निदर्शनास आणून दिले. महाविकास आघाडीकडून ईव्हीएमविरोधात जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. यासंदर्भात टिळक भवन येथे सलग दुसऱ्या दिवशी काँग्रेसच्या पराभूत व विजयी आमदारांची बैठक पार पडली. बैठकीत पुन्हा एकदा ईव्हीएमविरोधात रोष व्यक्त करण्यात आला. सायंकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के, रात्री ११.३० वाजता ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी ६६.०५ टक्के इतके मतदान झाल्याचे सांगण्यात आले. इतके मतदान कसे वाढू शकते असा सवाल पटोले यांनी केला. मतदान झाल्यानंतर निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदही घेतली नाही. यामुळे आयोगाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे ते म्हणाले.




## पोलीस उपनिरीक्षक नागेश खैरमोडे यांना पोलीस अधीक्षक यांच्याकडून विशेष पुरस्कार

कागल/पत्रकार नामदेव निर्मळे : कागल जिल्हा कोल्हापूर कागल पोलीस ठाणे येथील कार्यरत पोलीस उपनिरीक्षक नागेश खैरमोडे यांना पोलीस अधीक्षक कोल्हापूर श्री महेंद्र पंडित यांच्याकडून विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ऑक्टोंबर २०२४ मध्ये गुटक्याच्या ५ केसेस दाखल केलेल्या होत्या. तसेच जबरी चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणले होते. या जबरी चोरीमध्ये तब्बल ३,२०,०००/- हजार मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले होते. या केलेल्या कामगिरीबद्दल विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सर्वत्र यांचे कौतुक होत आहे.

# शिक्षण हे परिवर्तनाचे हत्यार आहे : महात्मा फुले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

एकविसाव्या शतकाकडे नजर लावून बसलेल्या भारतात शिक्षण तळागाळापर्यंत पोहचू शकलेलं नाही हे वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही समाजात हक्कांची जाण आहे. पण कर्तव्याचा विसरच पडला आहे. आजही दीनदुबळे दलित अन्याय सोसतच आहेत. परहिता साठी अष्टाप्रहर राबणारा, झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी आजही दारिद्र्याचे आणि अन्यायाचे चटके अनुभवतच वाटचाल करत आहे. शहरे सोडली तर आजही खेडोपाडी, डोंगरी भागात छोटी छोटी मुलं कामाला जुपली जात असल्यानं शिक्षणाला वंचितच आहेत. शांतता वर्षातही शांतता औषधालाही नाही. उलट जिकडे तिकडे द्वेषाचे, विद्रोहाचे अशांत वातावरण खदखदत आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढली आणि ज्ञानांच दालन त्यांच्यासाठी खुले केले हे जरी खरे असले तरी विषमता आणि जातीभेद यांना आज देखील पूर्णपणे मुठमाती मिळू शकलेली नाही, ही वास्तविकता आहे.

शिक्षणाचा प्रसार जर तळागाळापर्यंत झाला तरच क्रांती होईल असं तर ''विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शुद्र खचले''. शंभर वर्षापूर्वीची हिच स्थिती आजही आहे. माणसाच्या समुद्रात आज माणुसकीच हरवली आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमता याचं आजही पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. बंधुभाव फक्त ओठातच आहे.अशी स्थिती पाहिल्यावर महात्मा फुल्यांसारखी माणसं का बरं अस्वस्थ होणार नाहीत. आज जर महात्मा फुले आपल्यात असते तर त्यांनी आपल्या परखड विचारांच्या पवित्र्यांनी द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, दरिद्रय यांचा अंध:कार दूर करायचा नक्कीच प्रयत्न केला असता. आणि मग या विषयावर बोलायचा कदाचित प्रसंगही आला नसता.

हिंदू समाजातल्या मतलबी रुढींचा त्यांना तिरस्कार वाटू लागला. ज्योतिबांने शाळेतला अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच १८४७ पर्यंत ज्योतिबा बुध्दिने चांगले प्रौढ झाले होते. त्यांनी समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, आपला हिंदु समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत राहिल्याने प्रतिगामी बनला आहे. स्त्रियां आणि शुद्रांची कुचंबना होत आहे. हे सर्व स्त्रियां आणि बहुजन समाज शिक्षणापासुन दुर राहिल्यामुळे घडत आहे, असे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यावरुन त्यांनी भावी जीवनातील कार्याची दिशा ठरविली. ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता समाजकार्य करायचे ठरवून कामाला लागले. सामाजिक गुलामगीरी दूर करणे आणि सर्वांना शिक्षणाची दारे खुली करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरले.





**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

हे कार्य तत्कालीन रुढीप्रिय समाजाला रुचले नाही. मुलींची शाळा काढण्यासाठी पूर्व तयारी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी ही आपल्या पतीच्या जीवन कार्याला मनापासून सहाय्य केले. १८४८ मध्ये पहिली १८५१ मध्ये दुसरी आणि १८५२ मध्ये तिसरी मुलींची शाळा काढली. या शाळा व्यवस्थित चालू लागल्या. मेजर कँडी यांनी सरकारतर्फे ७५ रुपये अनुदान मंजुर केले. फुले यांच्या या महान सामाजिक कार्याचा गौरव म्हणुन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या नंतर ज्योतिबांनी सामाजिक सुधारणेकडे विशेष लक्ष द्यायचे ठरविले. व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि बुध्दि प्रामाण्य यासाठी ते झगडू लागले. सतीची प्रथा, विधवा पूर्नविवाह, भृणहत्या (लहान मुलांची हत्या) या समाज विघातक गोष्टींना त्यांनी विरोध केला. केवळ शाब्दिक विरोध न करता त्यांनी पुढाकार घेवून ''बालहत्या प्रतिबंधगृह'' ही संस्था सुरु केली. समाजस्पृश्य-अस्पृश्य असा भेदाभेद पाळणाऱ्याचा रोष पत्करुन त्यांनी आपल्या घरी असलेला पाण्याच्या हौद सर्वांना म्हणजे अस्पृश्यांनाही खुला केला.

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे लक्षात येताच अस्पृश्यासाठी, स्त्रियांसाठी त्यांनी शाळा उघडल्या, अनाथाश्रम काढले, वृत्तपत्र काढले. धर्म जन्माने न मिळता माणसाच्या स्वत:च्या बुध्दीने स्विकारला पाहिजे. शेतकयांच्या व्यथा इंग्रज प्रशासनाच्या कानी पोहोचविल्या.शेतकरी हा समाजाचा कणा आहे. पोशिंदा अन्नदाता आहे, असे मत मांडले आणि जगजागृती केली. त्यांच्या साठाव्या वर्षी जनतेने मुंबईस त्यांचा नेत्रदिपक सत्कार करुन त्यांना ''महात्मा'' ही पदवी बहाल केली. सामाजिक समता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी ज्योतिबाने अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड मिळाली जणू ती मानवतेच्या कणवतेची बैठक होती. ज्योतिबांच्या कृतीमुळे, कर्तृत्वामुळे या समाजाची नवी पहाट उदयास आली. सावित्रीमाई भारतातील आद्यकांतीकारी थोर स्त्री होती. ज्योतिबांना सावित्रीमाईची सक्रीय साथ लाभली. सामाजिक सुधारणेची सुरुवात आपल्या घरापासुन करणारे ज्योतिबाफुलें सारखे समाजसुधारक युगात होणे अशक्य आहे. सुधारकाग्रणी, संपूर्ण महाराष्टाचे भुषण, सुधारकांचे सुधारक त्यांच्या विचारांनी आणि धाडसी वृत्तीने कृत्तीने समाजाला जागे केले. काळाच्या खूप पुढे जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. हीन-दीन-जीवांना एकोणिसाव्या शतकात त्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

मानवी सामाजिक सुधारणेचे अवलोकन केले, परिस्थितीचे अवलोकन केले आणि प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याच्या दिव्य युगाकडे सामाजिक माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातील पहिला समाजक्रांतीकारक क्रांतिबा ज्योतिराव फुले नावाचा धगधगता लाव्हा तयार झाला. कारण देशात जातीभेदाची सुनामी ऊफाळुन आली होती. त्यामुळे कोणी शुद्र नदीकाठावर वस्त्रधुत असता तेथे एखादा भट आला तर शुद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करुन भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही, अशास्थळीजाऊन वस्त्रे धुवावी लागत. भटाच्या अंगावर नकळत पाण्याचा शिंतोडा उडालाच तर भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन आपल्या जवळचे जड भांडे शुद्रांच्या डोक्यावर मारावे, ब्राम्हणावर तर सावली सुध्दा पडू नये याची पूर्णपणे खबरदारी शुद्राने वस्तीतून वाट असेल त्या वाटेवरुन जाण्यास सुध्दा धोका पत्करु नये असा कायदा, अशा कायद्याचे राज्य होते, त्यामुळे राज्यात अनेक छळवाद होते. स्त्रियांना तर त्या रुढीने बंदीस्तच करुन ठेवले होते. पुरुषप्रधान व्यवस्थांच्या रणधुमाळी विषयी फुले म्हणतात की, स्त्री ही जात अबला असल्यामुळे तिच्यापूढे लोभी व धाडसी पुरुषांनी स्वत:चेच म्हणणे खरे केले आणि स्त्रीयांना मानवी हक्क समजू नयेत म्हणून पूर्ण अंधारात ठेवले. ज्योतिरावांना सावित्रीमाईंची भक्कम साथ मिळाल्यानंतर त्यांनी विचार केला की, हे आता शुद्र अतिशुद्रांचा छळवाद बदलला पाहिजे. त्यावेळे पासून स्त्री चळवळीचा जन्म झाला.

महात्मा फुले आज जरी आमच्यात नाहीत परंतु कर्तृत्वाच्या रुपाने ते निश्चितच आमच्यांत आहेत. कारण जे दुस-यांसाठी मरतात, तेच खया अर्थानं जगतात आणि आपल्या कार्यकर्तृत्वाच्या रुपानं अमर असतात, म्हणजेच आपल्यातच असतात. आता हे जर खंर असेल तर महात्मा फुले देखील कार्यरुपानं आपल्यातच आहेत, असं नाही का तुम्हाला वाटत? मला तर वाटतं, या विषयाच्या निमित्तानं ज्ञानज्योतीचं चरित्र आणि चारित्र्याचा आचार, विचार आणि उच्चाराचा जवळून परिचय व्हावा आणि आपण त्यांचे कार्य जोमानं, जिद्दीनं आणि निष्ठेनं करावं असंच बहुधा बहुतेकांना अपेक्षित असावं लौकिकर्थानं आज जरी महात्मा फुले आपल्यात नसले, तरी त्यांचे अलौकिक कार्य कलेकलेनं वाढतच राहणार आहे.आणि त्यांचे अस्तित्व तर नेहमीचे आपल्यात राहणार आहे.

ज्ञानज्योत प्रज्वलित केलेल्या ज्योतिबांना सामाजिक समता, मानवता, विवेक, विनय आणि नम्रता यावर प्रकाश टाकुन राष्ट्राला स्वायत्ततेच ध्येय गाठण्यासाठी गतिमान बनवायचं होतं. समाजजागरणाचा वसा घेतलेले स्त्रीशिक्षण आणि स्त्रीशक्ति जागृतीचा मंत्र निनादात ठेवणारे, आणि अस्पृश्यांबद्दल कणव आणि बंधुता बाळगणारे ज्योतिबा आज असते तर ! खरंच काय बरं वाटलं असतं त्यांना ? आजही समाजात समता आणि बंधुता पूर्णपणे उतरु शकली नाही हे पाहून ते नक्कीच अस्वस्थ झाले असते. जयंती आणि पुण्यतिथी या दोन दिवशी आपली आठवण ठेवणारे, याच दिवशी आपल्या पुतळयाला हार घालून खोटी पूजा करुन अवडंबर माजवणारे तथाकथित कार्यकर्ते आणि पुढारी पाहून त्यांना नक्कीच चीड आली असती.

६३ वर्षे चंदनासारखे झिजले. प्रवास केला, व्याख्याने दिली, लेख लिहिले. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद या आधुनिक मुल्यांवर भर देऊन सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली. डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. सहज सोप्या भाषेत नेमकी स्पष्टता आणणे त्यांना जमत असे. विचारांना कृतिशीलतेची जोड दिली. जैसे बोलावे, तैसे चालावे, मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे या समर्थवचनाची सार्थकता सिध्द करणारा हा महात्मा सर्व सुखाचे आगर नीतितत्त्वांचे माहेर अशा हया महात्म्याचे अविरत कष्टाने २८ नोव्हेंबर १८९० मध्ये अनंतात विलीन झाले, त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

## सावरकर विद्यालयामध्ये संविधान दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील कोठुरे येथे २६नोव्हेंबर, १९४९ रोजी भारतीय राज्यघटना देशाने औपचारिकपणे स्वीकारली. म्हणून भारतीय जीवनामध्ये २६ नोव्हेंबरला विशेष स्थान असून. संविधानाच्या कायदेविषयक जनजागृती होण्याच्या दृष्टीकोनातून हा दिवस आपल्या मविप्र समाज संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयात संविधान गौरवदिन म्हणून साजरा करण्यात आला.



विद्यालयात राष्ट्रगीत संपल्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक सानप शिवाजीराव यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जेष्ठ शिक्षक सावकार एन एल ,निकम एस बी,यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधान ग्रंथाचे पूजन केले. इयत्ता नववी अ ची विद्यार्थी धैर्य डोंगरे हिने संविधानातील प्रास्ताविकाचे प्रगट वाचन केले, तर विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका सुनीता दाणी यांनी आपल्या मनोगतातून भारतीय संविधान निर्मितीची पार्श्वभूमी व आपल्या देशातील कारभार संविधानातील कायदे व नियम यांच्यानुसार कसा चालतो हे सांगितले असुन ज्येष्ठ शिक्षक संजय निकम यांनी देशाच्या संविधान विषयी माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक सानप एस डी यांनी भारत हा जगातील सर्वात मोठा आदर्श लोकशाही देश आहे.

या देशाला एकात्म व अखंडीत ठेवण्याचे कार्य संविधान करत आहे.या संविधानाने आपल्याला खुप मोठे हक्क दिले आहे. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये आदर्श देशाचे आदर्श नागरिकत्वाची जडणघडण होण्यासाठी आपण सर्वांनी संविधान वाचले पाहिजे असे आवाहन शेवटी त्यांनी केले.

यावेळी २६/११च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय जवानांना व नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदन दिघे याने केले.या प्रसंगी कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

## लोहा विधानसभा मतदारसंघ झालेले प्रत्यक्ष मतदान व मतमोजणीमध्ये तफावत नाही : निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : लोहा विधानसभा मतदार संघात ईव्हीएम वर प्रत्यक्ष झालेले मतदान व झालेली मतमोजणी यात कोणतीही तफावत नाही असे निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी स्पष्ट केले

लोहा विधानसभा मतदार संघाचा मतमोजणी नंतर निकाल जाहीर झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी प्रसिद्धी पत्रक काढले आहे त्यात नमूद केले आहे की

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत ८८-लोहा विधानसभा मतदारसंघात ३३८ मतदान केंद्र व ३ लक्ष १हजार ६५० मतदार होते

-२० नोव्हेंबर रोजी मतदानाचे प्रक्रिया पार पडली.२ लक्ष २६ हजार ९९१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला मतदारानी सर्व ३३८ मतदान केंद्रावर मतदारांनी मतदान बजावले मतदान झाल्या नंतर प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदान केंद्र निहाय आकडेवारीत मानवी चुक होऊन मतदान केंद्र क्रमांक ३१९ मध्ये प्रत्यक्ष मतदान यंत्रावर झालेले मतदान ६७५ आहे पण ५२१ असा मतदानाचा आकडा प्रसिध्द झाले होता. मतदान यंत्रासोबत संबंधित मतदान केंद्राध्यक्ष यांचा नमुना १७-ल (नोंदविलेल्या मतांचा हिशेब) मध्ये एकुण ६७५ मतदान झाल्याचे नोंद आहे.



मतमोजणी दरम्यान नमुना १७-ल भाग-एक मध्ये नोंदविलेले मतदान व नियंत्रण युनिट (मतदान यंत्र) मधील मतदान ६७५ असुन ते जुळलेले आहे. त्यामुळे ८८-लोहा विधानसभा मतदारसंघात एतच् यंत्रावर झालेले एकुण मतदान (नोटासह) २लक्ष २६हजार ९९१ व मतमोजणी मध्ये उमेदवारानिहाय झालेली मतमोजणी (नोटासह) २लक्ष २६हजार ९९१ एवढ्या मतांची झालेली आहे. त्यामुळे -लोहा विधानसभा मतदारसंघात प्रत्यक्ष मतदान केंद्रावर झालेले एकुण मतदान व झालेली मतमोजणी यामध्ये मतदानाची कोणतीही तफावत नाही. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी दिली आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांचा विधानसभा निवडणुकीमध्ये यश संपादन केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केले अभिनंदन व सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**मा.अजित पवार यांच्या कडे आमदार दत्तात्रय मामा भरणे यांना व मा. देवेंद्र फडणवीस यांच्याकढे आमदार विजयकुमार देशमुख यांना मंत्री मंडळामध्ये समावेश करण्याची आनंद चंदनशिवे यांनी केली मागणी.**



मुंबई : आज मुंबईतील मा. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची सागर या निवासस्थानी तसेच मा.उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देवगिरी निवासस्थानी सकाळी भेट घेऊन राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्याकडून विधान सभा २०२४ च्या निवडणुकीत भरघोस यश संपादन केल्या बद्दल विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा तसेच निळी टोपी,शाल व बुके देऊन अभिनंदन पर सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या सत्कार वेळी मा.आमदार दत्तात्रय मामा भरणे व मा. आमदार विजयकुमार देशमुख यांनी मागील कार्यकाळा मध्ये विविध विभागाच्या मंत्री पदी काम केले असुन त्यांचा अनुभव पाहता शहर व जिल्ह्यातील पक्ष वाढबरोबरच पालक मंत्री पदी असताना विकास कामा करिता भरपुर निधी उपलब्ध करून दिला.

महानगर पालिका, नगर पंचायत, पंचायत समिती, ग्राम पंचायत निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मा.अजित दादा पवार यांच्या कढे आमदार दत्तात्रय मामा भरणे यांना व मा. देवेंद्र फडणवीस यांच्या कढे आमदार विजयकुमार देशमुख यांना मंत्री मंडळामध्ये समावेश करण्याची राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपअध्यक्ष तथा मा.गटनेते आनंद चंदनशिवे यांनी मागणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे ,सोलापूर महानगरपालिका मा. नगरसेवक गणेश पुजारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव इरफान शेख , युवा नेते प्रतिक चंदनशिवे,धीरज वाघमोडे, जमीर पटेल इत्यादी उपस्थित होते.

## भिवंडीत संविधान दिन साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव साजरा होत आहे. त्यानिमित्ताने भिवंडी तालुक्यातील समता सामाजिक संस्था यांच्या वतीने राहुल नगर येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन भिवंडी मनपाचे उपायुक्त शैलेश दोंदे,माजी शहर अभियंता एल .पी .गायकवाड यांनी केले. संविधानाची मूल्ये कळावी. तसेच त्यांचे प्रबोधन व्हावे याकरिता नागरिकांमध्ये भारतीय संविधानाची जनजागृती व्हावी याकरिता उपस्थितांना राज्यघटनेबद्दल माहिती देण्यात आली व संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.सदर कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांना संविधान प्रत देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार कैलास मस्के, पत्रकार महेंद्र सोनावणे , पत्रकार संतोष चव्हाण, कवयित्री सुरेखा पैठाणे,कवी मिलिंद जाधव ,कवी अक्षय भोईर, कवी वैभव जाधव, अशोक जाधव,पत्रकार तेजस आढाव, करण गायकवाड, ॲड प्रकाश कांबळे, काशिनाथ मस्के, सुरज दुपारगुडे, रोहिदास गायकवाड, अजय गायकवाड, संजय मस्के, महादेव गायचोडे, सिद्धार्थ गायचोडे, सुमित मस्के, साईनाथ बाळशंकर तर आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### डिस्क ब्रेक असलेली सायकल चोरट्याने पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : सहा हजार रुपये किमतीची डिस्क ब्रेक असलेली सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची फिर्याद बसवराज रामन्ना गुरव (वय-४०,रा.रोशन शाळेजवळ,मल्लिकार्जुन नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




हि घटना ११ नोव्हेंबर रोजी पद्मा नगर येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार पाटील हे करीत आहेत.

तसेच दुसरी घटना ही जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि.१३ ते १४ नोव्हेंबर दरम्यान घडली. फिर्यादी अशपाक राजेसहाब जातकर (वय-२५-,रा.प्रियंका चौक, भवानी पेठ) यांनी त्यांच्या राहत्या घरासमोर ६ हजार ५०० रुपये किमतीची डिस्क ब्रेक असलेली सायकल पार्क करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार आरेनवरु हे करीत आहेत.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल

सोलापूर, (प्रतिनिधी) : स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याची फिर्याद पोलीस हवालदार मल्हारी हणुमंत वाघमारे (नेमणूक सदर बझार पोलीस ठाणे) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून उदय भास्कर शिंदे (वय-५०,रा.क्रांतीनगर,भारतीय विद्यापीठ सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २१ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे अकरा वाजण्याच्या दरम्यान पत्रकार भवन येथे घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरील संशयित आरोपी उदय शिंदे हा कोल्हापूरहून त्याची स्वतःची रिक्षा क्रमांक एमएच.१३.जी.९९७२ यावरून राहत्या घराकडे सात रस्ता मार्गे जात असताना पत्रकार भवन येथे आला आले असता, काळजी न घेता रिक्षा निष्काळजीपणाने चालवून रिक्षाचे नियंत्रण सुटून रिक्षा पलटी होऊन स्वतः जखमी झाला.त्याला बेशुद्ध अवस्थेत बहीण जाधव हिने दाखल केले असता, उपचारापूर्वी उदय शिंदे मयत होऊन स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई.पाटील हे करीत आहेत.

# अकलूज येथे रयतेचा राजा-राजा शिवछत्रपती महानाट्याची जय्यत तयारी

## महानाट्याचा १२५ बाय ७० फुटाचा भव्य व्यासपीठाचे व नटराज मूर्तीची पूजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : हिंदवी स्वराज्याची संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दि.२व३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेला रयतेचा राजा-राजा शिवछत्रपती या महानाट्याचा १२५ बाय ७० फुटाचा भव्य व्यासपीठाचे व नटराज मूर्तीची पूजन सयाजी राजे मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले व आजपासून महानाट्याच्या सरावास प्रारंभ झाला व शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते पाटील यांनी सरावाच्या वेळी भेट देऊन आवश्यक त्या सूचना दिल्या.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती प्रारंभ समिती अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांनी च्या वतीने विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल अकलूज येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे महानाट्यात छत्रपती चित्रपट कलावंत शंतनु मोघे, अभिनेत्री पल्लवी वैद्य, रवींद्र कुलकर्णी, अभिनेते विश्वजीत फडते, यांच्यासह स्थानिक नवशहून अधिक कलाकारांचा समावेश आहे लेखक युवराज पाटील व दिग्दर्शक अजय तपकिरे, व सूत्रधार डॉक्टर विश्वनाथ आव्हाड त्याचबरोबर घोडे, बैलगाड्या, पायदळ व मावळे दिसणार आहेत.

यामा नाट्यात शिवजन्मापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतच्या ऐतिहासिक घटनांचे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या सहकार्यांच्या शौर्यांची गाथा उलगडणार आहे. या दोन दिवसाच्या महानाट्यासाठी सुमारे एक लाखाहून अधिक रसिक प्रेक्षक उपस्थित राहणार आहेत सहकार महर्षी साखर कारखान्याचे अध्यक्ष जेसीएम मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संग्राम शिवम मोहिते पाटील. कु. स्वरूपा राणी मोहिते पाटील सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध कमिटी कार्यरत असून क्रीडा संकुल येथे यांची जाहीर तयारी सुरू आहे यावेळी सचिव अभिजीत रणवरे सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते.





# दुधनी येथे संविधान दिन उत्सव साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/दुधनी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत भीमनगर येते संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रगतीशील शेतकरी शंकर भांजी, बाबा टक्कळकी, सैदप्पा झळकी आणि इतर मान्यवरांच्या हस्ते हा विधी पार पडला.

कार्यक्रमात संविधानाच्या महत्वावर विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सैदप्पा झळकी, निंगप्पा निंबाळ, शिवापुत्र गायकवाड यांसारख्या वक्त्यांनी भारतीय संविधानाचे मोल अधोरेखित करत प्रजासत्ताकाच्या सुदृढतेसाठी प्रत्येकाने आपले योगदान देण्याचे आवाहन केले.

यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आला. उपस्थित मान्यवरांमध्ये शंकर भांजी, बाबा टक्कळकी,सैदप्प झळकी, गोराकनाथ दोधामनी, निंगप्पा निंबाळ, संतोष जन्ना, गुरु दोड्डमनी, सुरेश झळकी, बसू जन्ना, सतलिंग निंबाळ, शिवपुत्र गायकवाड, काजप्पा शिंगे, महेंद्र लोडेंन, सैदप्पा झालकी, गुरु गायकवाड, लक्ष्मीपुत्र रेऊर, अर्जुन झालकी, पिंटू लोड्डन, मुक्यादापाक माल्लाप्पा कांबळे सर आणि महेश गायकवाड सर, लक्ष्मीबाई देगांव मॅडम , अर्चना गवई मॅडम, मालकमा हौदे मॅडम यांचा समावेश होता.

सुत्रसंचालन शाळेच्या शिक्षकांनी केले, तर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. संविधान दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला हा उत्सव नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी प्रेरणादायी ठरला.

# स्वेरीमध्ये 'भारतीय संविधान दिन' साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये प्राध्यापक व विद्यार्थीयांच्या उपस्थितीत'भारतीय संविधान दिन'साजरा करण्यात आला.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर यांच्याकडून प्राप्त परिपत्रकानुसार व स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली,स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने,उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवारयांच्या नेतृत्वाखालीस्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्याराष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून विद्यार्थी व प्राध्यापकांच्या उपस्थितीत हा'संविधान दिन'साजरा करण्यात आला. प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख डॉ.आर.एन. हरीदासयांनी उपस्थितांना'भारतीय संविधानाची निर्मिती कशी झाली,भारतीयांचे मुलभूत हक्क व अधिकार, लोकशाही शासन पद्धतीचे महत्व, स्वातंत्र्य, समता, बंधुता,सर्वधर्म समभाव आदी बाबत सविस्तर माहिती देवून भारतीय संविधानाचे महत्व पटवून दिले. आधुनिक भारताच्या प्रगतीचा खरा आधार म्हणजे आपले संविधान आहे असे त्यांनी आवर्जून नमूद केले. यावेळी भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच २६/११ च्या दहशतवादी हल्लात वीरमरण प्राप्त झालेले पोलीस अधिकारी अशोक कामटे, दहशतवादी हल्ला प्रतिकार पथकाचे प्रमुख (एटीएस) हेमंत करकरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय साळसकर, पोलीस कर्मचारी तुकाराम ओंबाळे, मेजर उन्नी कृष्णन यांच्यासह शहिद झालेल्या भारत मातेच्या इतरही वीर जवानांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. यावेळी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, डॉ. एस. ए. लेंडवे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.डी. एस. चौधरी,डॉ.एम. एम. आवताडे,प्राध्यापक वर्ग वशिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# तीर्थक्षेत्र आळंदी येथे वैष्णवांची मांदियाळी










### शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे अभिवादन

### रविशंकर इठूले यांचे प्रतिपादन

# विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याची प्रेरणा घ्यावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/गोदिंया : राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फूले यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्याची महती फारच अलौकीक आहे. त्यांनी केलेले कार्य हे या देशाला प्रेरणादायी ठरणारे आहे. समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण मिळावे व तो घटक शिक्षीत व्हावा यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. म्हणून शैक्षणिकदृष्ट्या विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याची प्रेरणा घ्यावी. असे प्रतिपादन मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले. ते स्मृती दिन कार्यक्रमात बोलत होते.



यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतील शिक्षक नीता भलमे, अस्मिता तेलंग, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे अर्चना चव्हाण व तुषार महाजन आदी उपस्थित होते.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक यांनी स्मृतिदिनानिमित्त महात्मा ज्योतिबा फूले यांच्या प्रतिमेला माला अर्पण करून, दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेत २८ नोव्हेंबर राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्मृती दिवस हे अभिवादन कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रम संचालन व आभार मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व समित्या, विद्यार्थी व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# सिन्नूर ग्रामपंचायत येथे संविधान दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/दुधनी : अक्कलकोट तालुक्यात सिन्नर ग्रामपंचायत येथे संविधान दिन निमित्त सरपंच कल्पना सोनकांबळे यांनी भाषणत बोलत संविधान मुळे सर्वा नागरिकांना स्वातंत्र्य अधीकार दिले आणि देश चालत आहे होते प्रारंबी बाबासाहेब आंबेडकर फोटो पूजन सरपंच उपासरपंच हसाते कारण्यात आले यावेळी सरपंच कल्पना सोनकांबळे, उपासरपंच प्रकाश कळसगोंडा, अंगणवाडी सेविका स्वामी मॅडम अत्तर बाई गुरुताई, अपरेटर शिवापुत्र जेवर्गी, श्रीमंत कोटनूर, सैपन मुल्ला राजू कांबळे व आदी ग्रामस्थ उपस्थित होते